TACTFUL MANAGEMENT RESEARCH JOURNAL

ISSN: 2319-7943
IMPACT FACTOR : 2.9016(UIF)
VOLUME - 5 | ISSUE - 10 | JULY - 2017



# 21 व्या शतकातील महिला उद्योजकता व शक्ती

प्रा. डॉ. आर. एम. सरोदे[1], प्रा. एन. ई. भंगाळे[2]
[1]दादासाहेब दे. ना. भोळे महाविद्यालय, भुसावळ.
[2]भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ.

*सारांश :–*

उद्योजकता हे महिलांच्या कतृत्वाचे क्षेत्र नव्हे, महिला उद्योजक होवू शकत नाहीत. ही भारतीय समाजमनात अजूनही काही प्रमाणात असलेली एक धारणा आहे. महिलांना उद्योजक बनण्यापासून परावृत्त करण्यासाठी अनेक शक्ती कार्यरत आहे. काही महिला पतिच्या मृत्यूमुळे, आजारामुळे म्हणजेच एखादी घटना कुटुंबात घडल्यानंतर उद्योजक बनल्या त्यानंतर त्यांनी दुसरे उद्योग स्थापन केलेले दिसतात किंवा त्याच उद्योगाची वाढ मोठया प्रमाणावर केलेली आहे. काही महिलांना अभिप्रेरणा मिळाल्यामुळे उद्योजक बनल्या आहेत. एकूणच महिलांचे प्रमाण 48 टक्के असल्यामुळे देशाच्या विकासामध्ये महिलांचा सहभाग उद्योजकतेत निर्माण झाल्यास देशाचा आर्थिक विकासाला मोठे साहाय्य होईल. भारतात काही महिलांना संधी मिळाली त्यांनी त्या त्या क्षेत्रात यशाचे शिखर गाठण्याचा प्रयत्न केला आहे त्यामुळे महिलांना विविध क्षेत्रात संधी देणे ही एक सामाजिक आणि राष्ट्र उभारणीच्या कार्याची एक गरज आहे. काही महिला वारसाने मिळालेल्या उद्योजकतेच्या गुणांनी संपन्न असतात. गरज आहे त्यांना त्यांचे अधिकार, हक्क आणि संधी देण्याची. शासनसुध्दा आपल्या विविध धोरणांतर्गत, स्वतंत्र महिला आर्थिक विकास महामंडळ स्थापून, विविध योजना आखून महिलांना देशात यशस्वी उद्योजकाचे प्रमाण कसे वाढविता येईल याविषयी जागृत आहे. सदर शोध निबंधात भारतातील ज्या काही महिला उद्योजकतेत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर यशस्वी झालेल्या आहेत त्यांच्याविषयी थोडक्यात अभ्यास केला आहे.

*प्रस्तावना :–*

आज आपले राष्ट्र महासत्ता होणार याविषयी अनेक तज्ज्ञ विचारवंत, शास्त्रज्ञ, राजकीय नेते, अंदाज व्यक्त करीत आहे आणि त्या दृष्टीने प्रत्येक स्तरावर आपल्या देशात नियोजन करण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु त्यामध्ये महिलांच्या रूपाने 45 ते 48 टक्के प्रमाणात असलेल्या कर्तृत्ववान मनुष्यबळाचा उपयोग राष्ट्राच्या विकास प्रक्रियेत करून घेण्यात खरी उद्योजकता आहे असे म्हणता येईल. महिलांना स्वातंत्र्य, समान संधी देण्याच्या फक्त गप्पा न मारता प्रत्यक्ष कृतीशी अपेक्षा आहे. या दृष्टीने समाज, गाव, राज्य, देशाच्या व्यवस्थेचा विचार करण्यापेक्षा त्या समाजातील कुटुंब प्रमुखाने आपल्या कुटुंबातील महिलांना व त्यांच्या कर्तृत्वाला वाव देण्याचा 'पुरूषार्थ' दाखवणे गरजेचे आहे यामध्ये कुटुंबाचे, समाजाचे व राष्ट्राचे हित आहे यात शंका नाही.

महिलांच्या कर्तृत्वाला वाव मिळण्यास खऱ्या अर्थाने 19 वे आणि 20 वे शतक महत्त्वाचे ठरले आहे. या कालखंडात भारतीय महिलांच्या जीवनात अनेक आमुलाग्र बदल घडून आले आहे. त्याचे व्यक्तिमत्व बदलले. सामाजिक, सांस्कृतिक व कौटुंबिक अस्तित्व अर्थपूर्ण बनले. समाजाचा महिलांकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मक होवू लागला. महिलांना आत्मप्रतिष्ठेची जाणीव होवून स्वसामर्थ्याचे भान आले, सुप्त व दबलेल्या क्षमता, अनुभूती ओळखून त्यांनी कर्तृत्वाच्या आकांक्षांनी प्रोत्साहित होवून विविध क्षेत्रात पदार्पणाच्या संधी मिळवल्या आहेत. एकेकाळी रूढी, परंपरा यांच्या जोखंडात अडकलेल्या महिलांनी संधी मिळताच क्षमता सिध्द करून आपल्या क्षेत्रात कर्तृत्व सिध्द केलेले दिसते.

शासनाने 1991 मध्ये औद्योगिक धोरण ठरवितांना महिला उद्योजकतेबाबत प्रथमच विचार केला आणि महिला उद्योजक कोणाला म्हणावे याबाबत निश्चित व्याख्या केली. त्यामध्ये उद्योगाची मालकी व नियंत्रण हे महिलेकडे असावे. उद्योगाचे भांडवल किमान 51 टक्के भांडवल महिलेने पुरविले असावे आणि उद्योगात रोजगार 51 टक्के महिलांनाच दिलेला असावा असे ठरविण्यात आले परंतु रोजगाराविषयी काही अडथळे आल्यामुळे त्यात बदल करण्यात आला. 1994 मध्ये महिलांसाठी स्वतंत्र महिला धोरण, 2001 मध्ये दुसरे महिला धोरण, 2013 मध्ये तिसरे महिला धोरण आखण्यात आले आणि या धोरणांद्वारे महिला सक्षमीकरणासाठी उद्योग हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे असे मानून काही बरेच चांगले निर्णय झाले व बरेच उपक्रम मार्गी लागले.

भारतात काही महिलांनी 1970 पासून व्यवसाय / उद्योगात प्रवेश केला असून 1975 नंतर शासकीय धोरणात अनेक बदल झाले. त्यामुळे अनेक नवीन पिढीतील महिलांमध्ये चांगल्या प्रकारे जागरूकता निर्माण झालेली आहे. 1980 नंतरच्या काळात महिलांचा उद्योगक्षेत्रात मधील प्रवेश दिसू लागला आहे. लघुउद्योग क्षेत्रात उद्योजकांची संख्या 1,06,721 (10.11 टक्के) आहे. या सर्व महिला लघु उद्योगक्षेत्रांशी निगडित आहे. त्यापैकी 13 टक्के महिला या लघुउद्योग क्षेत्रात नोंदणीकृत आहे आणि उर्वरित 87 टक्के अनोंदणीकृत आहे.

भारतात काही यशस्वी उद्योजक महिला देशाच्या विकासात वाढ करण्याच्या दृष्टीने आपली भूमिका योग्य प्रकारे पार पाडत आहे. त्यात सावित्री जिंदल, इंदू जैन, अनुआगा, किरण मजुमदार शॉ, शोभना भारतीय, एकता कपूर, प्रीथा रेड्डी, रोशनी नाडर, लावण्यनल्ली, नंदिनी पिरामल, अमीरा शाह, लक्ष्मी वेणू या महिलांचा थोडक्यात या शोधनिबंधाच्या रूपाने अभ्यास करण्यात आला आहे.

***उद्दिष्टये :–***

1.महिला उद्योजक म्हणजे काय ?
2.विविध यशस्वी महिला उद्योजकतेचा अभ्यास करणे.
3.यशस्वी महिला उद्योजकतेबाबत निष्कर्ष काढणे.

***संशोधनाची पध्दत :–***

या शोध निबंधासाठी आवश्यक असलेली माहिती दुय्यम माहितीच्या स्त्रोतावरे गोळा करण्यात आली आहे त्यात विविध पुस्तके, मासिके, वर्तमानपत्र, वेबसाईट याचा उपयोग करण्यात आला आहे. त्यानुसार निष्कर्ष मांडण्यात आले आहे.

***महिला उद्योजक :–***

''महिला उद्योजकता म्हणजे महिलांनी स्थापन केलेले किंवा महिलांकडून ज्या उद्योगाचा कारभार संचलित होतो असे उद्योग होय.'' याशिवाय 1991 च्या औद्योगिक धोरणात प्रथमच महिला उद्योजकतेची व्याख्या करण्यात आली. त्या व्याख्येनुसार ज्या उद्योगाची मालकी व नियंत्रण महिलेकडे आहे. उद्योगाच्या भांडवलात किमान 51 टक्के भांडवल महिलेचे असावे, आणि त्या उद्योगात 51 टक्के महिलांना रोजगार दिलेला असावा असे ठरविण्यात आले परंतु या सर्व अटी पूर्ण करण्याचा आग्रह धरल्यामुळे महिला उद्योजकाचे प्रमाण कमी होतांना दिसते. महिला उद्योजकतेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अडथळा येत आहे हे लक्षात आल्यावर भारत सरकारने महिला उद्योजकतेच्या व्याख्येमध्ये सुधारणा केली. महिलांचे उपक्रम हे लघुउद्योग, उद्योगांशी संबंधित सेवा किंवा व्यावसायिक उपक्रमाची एका महिलेचे किंवा जास्त महिलांची मालकी असावी आणि त्यांनी व्यवस्थापन करावे तसेच महिलांनी त्यातील भांडवलाच्या 51 टक्के भांडवल भागीदारी, भागधारकांच्या किंवा खाजगी मर्यादित कंपनीच्या संचालकाच्या स्वरूपात आणावे अशी दुरूस्ती करण्यात आली. भारतात क्रेडिस सुईस संस्थेच्या 'वुमन इन बिझिनेस' या अहवालात असे म्हटले आहे की ज्या कंपन्यांमध्ये महिला ही सीईओ आहेत किंवा संचालक मंडळात महिला आहे अशा कंपन्या भागधारकांना अधिक लाभांश देतात असे दिसून आले आहे. तसेच 'महिला सीईओ' नियुक्तीमध्ये भारत विकसित देशाच्या पुढे गेला आहे. भारतात महिला सीईओचे प्रमाण 8.9 टक्के आहे तर जगभरात हे प्रमाण 3.9 टक्के आहे. अमेरिकेत हा आकडा 3.5 टक्के आहे. क्रेडिट सुईस या संस्थेने जगभरातील 3 हजार कंपन्याच्या सर्वोच्च 28000 पदाच्या आकडयांवरून हा अहवाल तयार केला आहे. त्याचप्रमाणे भारतात नोंदणीकृत कंपन्याच्या संचालक मंडळात किमान एक महिला संचालक असावी हा नियम आहे. तसे नसल्यास सेबीने दंडाचीही तरतूद केली आहे. महिला संचालकांची नियुक्ती न केल्यास सेबीने जुलै 2016 मध्ये 530 कंपन्यांना दंड केला होता.

***यशस्वी महिला उद्योजक :–***

सुरुवातीला महिला उद्योजकते बाबतच्या व्याख्यामध्ये भारत सरकार, कमलसिंग, पंडित जवाहरलाल नेहरु यांनी दिलेल्या उद्योजकता व्याख्या दिल्या आहेत. महिला उद्योजक म्हणजे या उद्योगाने 51 टक्के भांडवल महिलांनी गुंतवले आहे आणि 51 टक्के महिलांना रोजगार उपलब्ध करुन दिला आहे. असे उद्योग तसेच जी महिला उद्योग व्यवसाय करुन स्वबळावर आर्थिक स्वातंत्र मिळवते अशा महिलांचा उद्योजक महिलांमध्ये समावेश होतो असे म्हटले आहे.

मॅक्लेलॅड यांच्यामते यशस्वी महिला उद्योजकामध्ये असाधारण सृजनात्मकता, जोखीम स्वीकारण्याची वृत्ती आणि यश संपादन करण्याची इच्छा असते.

प्रा. बी. सी. टंडन यांच्यामते यशस्वी महिला उद्योजकामध्ये तांत्रिक ज्ञान परिवर्तन करण्याची क्षमता जोखीम स्विकारण्याची क्षमता, आवश्यक संसाधन सामुग्री जुळवाजुळव त्यानुसार संघटन उभारण्याची क्षमता त्यानुसार प्रशासकीय निर्णय वेळोवेळी घेण्याचे ज्ञान व कौशल्य सुध्दा उपजत निर्माण होत असते.

भारतातील काही यशस्वी महिला उद्योजकांची माहिती खालीलप्रमाणे आहे :–



***1) सावित्री जिंदल :–***

जिंदल स्टिल आणि पॉवर लिमिटेड कंपनीचा कारभार यशस्वीपणे त्या सांभाळात असून त्या 42 वर्षाच्या आहेत. जगातील 44 आणि भारतातील क्रमांक एकच्या श्रीमंत महिला उद्योजिका आहेत त्या ओ. पी जिंदल ग्रुपच्या अध्यक्ष असलेल्या ह्या सावित्री जिंदल यांनी सलग चार वर्ष भारतातील सर्वात श्रीमंत महिला असण्याचा मान मिळविला गेल्यावर्षी फोबर्स मासिकाने जाहीर भारतीय श्रीमंताच्या यादीत जिंदल यांची संपत्ती 5.3 बिलियन डॉलर (34238 करोड) असल्याचे जाहीर झाले आहे.



***2) इंदू जैन :–***

बेनेट कोलेमन ॲन्ड कार्पोरेशन अध्यक्ष असलेल्या इंदू जैन भारतातील दुसऱ्या क्रमांकाच्या उद्योजीका आहे. त्यांची संपत्ती 2.8 बिलियन डॉलर (18088 कोटी) आहे. इंदू जैन सातत्याने आपला उद्योजकीय व्याप वाढविण्यावर सतत भर देतांना दिसतात आणि त्यांच्या उद्योगातील उलाढाल दुपटीवर जाण्याची शक्यता आहे.



***3) अनुआगा*** :– थरमॅक्सग्रुपच्या प्रमुख असलेल्या अनुआगा यांनी भारतातील श्रीमंताच्या यादीत तिसरा क्रमांक मिळवला आहे. 1985 पासून त्या थरमॅक्समध्ये त्यांच्या पतीचे निधन झाल्यानंतर थरमॅक्स ग्रुपचा कारभार त्यांच्याकडे आल्यानंतर अनेक निर्णय त्यांनी घेतले आणि त्यांची संपत्ती 1.06 बिलियन डॉलर (6848 करोड) आहे.



***4) किरण मुजुमदारशॉ :–***

बायोकॉन इंडियाच्या किरण मुजुमदार शॉ यांना श्रीमंत महिलाच्या यादीत 75 : गुण देण्यात आले असून त्यांची संपत्ती 900 डॉलर मिलीयन आहे. महिलांमध्ये भारतात चौथ्या क्रमांकावर आहत 1978 मध्ये रु 10000 भांडवलावर बायोकॉन इंडिया कंपनी स्थापन केली त्याचे शिक्षण बिशप कॉटन गर्ल्स स्कूल आणि मांऊट काश्मेल कॉलेज, बंगलोर येथे झाले आज बायोकॉन ही भारतात सर्वात मोठी असलेली बॉयोफॉम्युसीक्युटीकल कंपनी आहे.



***5) शोभना भारतीय :–***

हिंदूस्थान टॉइम्सच्या शोभना भारतीय यांना फोर्बस मासिकाने जाहीर केलेल्या भारतीय श्रीमंत महिलांच्या यादीत 76 टक्के गुण मिळालेले आहेत. विशेष म्हणजे फॉर्च्युन मासिकाने जाहीर केलेल्या शक्तीशाली महिलांच्या यादीत त्यांना ५० वा कमांक मिळाला होता त्यांची एकूण संपत्ती 895 डॉलर मिलियन असून त्या पाचव्या क्रमांकाच्या श्रीमंत भारतीय महिला आहे.



***6) एकता कपूर :–***

भारतीय टेलिव्हिजन इंडस्टभीची राणी म्हटले जाते. बालाजी टेलिफिल्म कंपनी टेलिव्हिजन इंडस्टभीमधील चलनी नाणे आहे. आपल्या उद्योजकतेमध्ये अत्यंत कमी वेळेत यशस्वी होवून यशाचे शिखर गाठले. त्यांची एकूण संपत्ती 12 मिलियन डॉलर एवढी आहे.



***7) प्रीथा रेड्डी :–***

चेन्नई अपोलो हॉस्पिटलच्या व्यवस्थापकीय संचालक असून आपल्या कौशल्यावर अग्रगण्य हेल्थकेअर उद्योजक म्हणून यशस्वी उद्योजिका म्हणून यादीत नाव समाविष्ट झाले आहे. त्यांची संपत्ती 500 करोड आहे.

याशिवाय अलिकडे 35 वर्षाच्या आत नवीन महिला उद्योजिक उदयास आल्या आहेत त्यांची माहिती सदर पेपरमध्ये नवीन होतकरु तरुणीना करुन देणे आवश्यक वाटते.



***8) रोशनी नाडर :–***

एच.सी.एल कंपनीच्या सीईओ कार्यकारी संचालक, वय 29 वर्ष शिझण – एम बी ए
एकुण संपत्ती रु 27 हजार कोटी वडिलांचा व्यवसाय पुढे वाढवला



***9) लावण्यनल्ली :–***

नल्ली सिल्कच्या सीईओ,वय – 29 शिक्षण एम.बी.ए.
संपत्ती रु 5.50 कोटी वडिलांचे प्लॅगशिप स्टोअर्स होते त्याच व्यवसायची वाढ करुन देशात आज एकूण २६ स्टोअर्स आहेत. कंपनीचा ग्रोथ दरवर्षी 12 टक्के आहे.



***10) नंदिनी पिरामल :–***

पिरामल हेल्थ केअरच्या कार्यकारी संचालक वय – 30 वर्ष संपत्ती रु. 550.40 कोटी आहे. वडिल विरामकल यांच्या उद्योगाबाबत चालत असलेल्या चर्चामुळे प्रेरणा मिळून उद्योगजगत समजून घेतले आणि आता आज पिरामल कंपनीला देशातील टॉप 5 मध्ये पोहचवण्याचे त्यांचे ध्येय आहे.



***11) अमीरा शाह :–***

वडिल डॉ. सुशील शाह यांच्या पॅथॉलॉजी लॅबला अमीरा यांनी प्रयोगशाळा शृंखलेचे रुप दिले आणि दरवर्षी 15 ते 20 नवीन लॅब सुरु करणे आणि 5 ते 10 कोटीची आधुनिक उपकरणाची खरेदी करणे हे नियोजन केले आहे.
मेटभोपॉलीस हेल्थकेअरच्या आज सीईओ व एम. डी वय – ३१ , शिक्षण : एमबीएम संपत्ती एक हजार रूपये कोटी.



***12) लक्ष्मी वेणू :–***

सुंदरम क्लेयटनच्या उपाध्यक्ष व संचालिका वय २७ वर्ष शिक्षण अर्थशास्त्राची पदवी नंतर वॉरविक विद्यापीठातून डॉक्टरेट.
संपत्ती 26 हजार 500 कोटी यासुध्दा टी.व्ही.एस. कंपीनचे प्रमुख वेणू श्री निवासन यांची मुलगी आहे.

*निष्कर्ष :—*

संबंधित सादर करण्यात आलेल्या पेपरमध्ये दिलेल्या माहितीवरुन व इतर दिलेल्या माहितीवरुन असे निर्दशनास येते की, भारतातसुध्दा काही उद्योजक महिला यशस्वी झाल्या असून महिलांनी स्वतः आपल्या ज्ञान व कौशल्यातून उद्योगात उंच भरारी घेतली आहे. जागतिक स्तरावर सुध्दा भारतीय महिलांचा उद्योगजगतात विचार करण्यात येत आहे. तसेच काही महिला आपल्या कुटुंबाचा आधार किंवा वारसा हक्काने यशस्वी उद्योजिका आहेत. अशा तरुणींनी अत्यंत कमी वेळेत आर्थिक स्वातंत्र्य, स्वतःची ओळख, क्रियाशीलता, जोखीम स्विकारण्याची क्षमता, समाजात स्वंतत्र स्थान निर्माण करण्यात यशस्वी झालेल्या आहेत. अशा यशस्वी महिला उद्योजकांविषयी प्रसारमाध्यमांव्दारे प्रसिध्दी करणे आवश्यक वाटते जेणेकरुन या महिलांची उद्योगशीलता कार्य करण्याची पध्दत जोखीम स्विकारण्याची क्षमता, इ. ची प्रेरणा नवीन पिढीतील तरुणींना मिळू शकेल आणि महिला मध्ये एकूण उद्योजकता वाढून भारतामधील 48 टक्के महिला वर्गाचा देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लावण्यास मदत होवून देश लवकर समृध्दी प्राप्त केल्याशिवाय राहणार नाही.